Krsnaa Diagnostics
LET'S DO GOOD...

Date: September 06, 2026
Ref. No.: KDL/SE/042/2026-27

To, **BSE Limited** **Corporate Relationship Department** 25th Floor, Phiroze Jeejeebhoy Towers Dalal Street, Mumbai- 400001 **Scrip Code:** 543328	To, **National Stock Exchange of India Limited** Exchange Plaza, Plot No. C-1, Block G, Bandra Kurla Complex, Bandra (East) Mumbai – 400051 **NSE Symbol:** KRSNAA

Dear Sir/Madam,

Sub: Newspaper Publication relating to Annual General Meeting.

Please find enclosed copies of the newspaper publications with respect to the completion of the dispatch of Annual Report and the Notice Convening the 16th Annual General Meeting of the Company.

The advertisements were published on September 06, 2026 in the following Newspapers:

1. Financial Express, English newspaper
2. Loksatta, Marathi newspaper

This will also be hosted on Company's website at www.krsnaadiagnostics.com/investors

Request you to take the same on your records.

Thanking you,
Yours sincerely,

For **Krsnaa Diagnostics Limited**

Sujoy Sudipta Bose
Digitally signed by Sujoy Sudipta Bose
Date: 2026.09.06 13:13:18 +05'30'

Krsnaa Diagnostics Limited

Sujoy Sudipta Bose
Company Secretary & Compliance Officer
Encl: as above

"IMPORTANT"

Whilst care is taken prior to acceptance of advertising copy, it is not possible to verify its contents. The Indian Express (P) Limited cannot be held responsible for such contents, nor for any loss or damage incurred as a result of transactions with companies, associations or individuals advertising in its newspapers or Publications. We therefore recommend that readers make necessary inquiries before sending any monies or entering into any agreements with advertisers or otherwise acting on an advertisement in any manner whatsoever.

Dr. Babasaheb Ambedkar Technological University, Lonere
Web site : www.dbatu.ac.in, E-mail : registrar@dbatu.ac.in, academicsection@dbatu.ac.in

ACAP/Institute Level Round For First Year & Direct Second Year B.Tech, First Year B.HMCT, M.Tech, MBA & M.C.A

The Institute Level Round for admissions against CAP vacancies is schedule as follows:

09/09/2026	Direct Second Year B. Tech (DSE)
	BHMCT (First Year)
10/09/2026	First Year B. Tech
11/09/2026	First Year M.Tech, M.B.A and M.C.A (PG Course)

The available vacancies for First Year Engineering and Master level programs and other information details (Fees, Admissions rules etc.) are available on www.dbatu.ac.in.

Sd/-
(Dr. A. P. Shesh)
REGISTRAR

एचडीबी फायनान्शियल सर्व्हिसेस लिमिटेड

नोंदणीकृत कार्यालय : राधिका, दुसरा मजला, लॉ गार्डन रोड, नवरंगपुरा, अहमदाबाद, गुजरात, 380009. **क्षेत्रीय कार्यालय :** दुसरा मजला, विल्सन हाऊस, जुना नगरदास रोड, आंबोली सबवे जवळ, अंधेरी पूर्व, मुंबई 400069 आणि महाराष्ट्रातील त्यांच्या विविध शाखा.

ताबा सूचना

ज्याअर्थी, एचडीबी फायनान्शियल सर्व्हिसेस लिमिटेड च्या प्राधिकृत अधिकाऱ्यांनी सिक्युरिटायझेशन अँड रिकन्स्ट्रक्शन ऑफ फायनान्शियल ॲसेट्स अँड एनफोर्समेंट ऑफ सिक्युरिटी इंटरेस्ट ॲक्ट, 2002 (2002 चा 54) अंतर्गत आणि सिक्युरिटी इंटरेस्ट (एनफोर्समेंट) रूल्स, 2002 च्या नियम 3 सह वाचण्यात येणाऱ्या कलम 13(2) अंतर्गत प्रदान केलेल्या अधिकारांचा वापर करून मागणी सूचना जारी केल्या होत्या. कर्जदार / सह-कर्जदार / जामीनदार यांनी रक्कम परत करण्यास असमर्थ ठरल्याने कर्जदार / सह-कर्जदार व सर्वसामान्य जनतेस याद्वारे सूचित करण्यात येते की खाली नमूद मालमत्तेचा **सांकेतिक ताबा** घेतला आहे. विशेषतः कर्जदार / सह-कर्जदार व सर्वसामान्य जनतेस सावध करण्यात येते की मालमत्तेबाबत कोणताही व्यवहार करू नये आणि असा कोणताही व्यवहार एचडीबी फायनान्शियल सर्व्हिसेस लिमिटेड च्या खाली नमूद रक्कम अधिक त्यावरील व्याज, खर्च व शुल्क यांच्या भाराधीन असेल.

सदर मालमत्तेवरील कर्जदार व सह-कर्जदारांचे तपशील, कर्ज खाते क्रमांक, थकबाकी रक्कम, मागणी सूचनेचा दिनांक आणि ताबा दिनांक इ. माहिती खाली देण्यात आलेली आहे :

अ. क्र. 1. कर्जदार, सह-कर्जदार / जामीनदाराचे नाव आणि पत्ता, 2. कर्ज खाते क्र. 3. युआयसी क्र., 4. मंजूर कर्जाची रक्कम 5. सुरक्षेचे तपशील 6. गहाणदाराचे नाव, 7. मागणी सूचना दिनांक 8. दावा रक्कम रु. मध्ये 9. ताबा दिनांक.

1. कर्जदार आणि सह-कर्जदार :- 1) अवंती डिस्ट्रिब्युटर्स रा. :- 1254 सुजाता मस्तानी जवळ, निवाळकर तालीम चौक सदाशिव पेठ पुणे - 411030 महाराष्ट्र **2) रमेश कुंदनमलजी राजवट 3) रेखा रमेश राजवट सर्व रा.** :- फ्लॅट 405 4 था मजला श्री इमारत कुमार पुष्प मुकुंद नगर पुणे - 411037 महाराष्ट्र **4) रीतिक रमेश राजवट, रा.** :- सी-405, कुमार पुष्प, पुणे सातारा रोड लक्ष्मीनारायण थेटर स्वारगेट पुणे - 411037 महाराष्ट्र **2. कर्ज खाते क्रमांक** :- 602635, 1030285, 2189768, 8283685 **3) कर्जाची रक्कम भा. रु. मध्ये** : कर्ज खाते क्रमांक 602635 द्वारे रु. 3700000/- (रुपये सदतीस लाख फक्त) **आणि कर्ज खाते क्रमांक** 1030285 द्वारे रु. 799000/- (रुपये सात लाख नव्याण्णव हजार फक्त), आणि कर्ज खाते क्रमांक 2189768 द्वारे रु. **2437250/- (रुपये चोवीस लाख सदतीस हजार दोनशे पन्नास फक्त)**, आणि कर्ज खाते क्रमांक 8283685 द्वारे रु. **2025721/-** (रुपये वीस लाख पंचवीस हजार सातशे एकवीस फक्त), **4) सुरक्षेचे तपशीलवार वर्णन** :- तारण मालमत्ता : सुरक्षा -I ची **अनुसूची** :- पुढील मालमत्तेचे सर्व खंड आणि तुकडे, फ्लॅट क्र. 405 मोजमाप क्षेत्रफळ 71.99 चौ. मी. कुमार पुष्प नावाने ओळखल्या जाणाऱ्या नोंदणीकृत को-ऑपरेटिव्ह हाऊसिंग सोसायटी मधील इमारत क्रमांक सी च्या चौथ्या मजल्यावर, जमीन संबंधित स. क्र. 707-ए हिस्सा क्र. 1+7+8+14+15+16 एकूणे क्र. 411 टीपी योजना क्र. III उप प्लॉट क्र. 6 मोजमाप सुमारे 89 चौ मी यावर स्थित, गाव मुलटेकडी येथे, तालुका हवेली, जिल्हा पुणे, पुणे महानगरपालिका हद्दीत. **5) मागणी सूचना दिनांक : 19/06/2026 6) एकूण देय रक्कम भा. रु. मध्ये :- रु. 51,02,400.49/-** (रुपये एक्कावन्न लाख दोन हजार चारशे आणि एकोणपन्नास पैसे फक्त) दि. 19.06.2026 रोजी पर्यंत आणि सोबत आनुषंगिक खर्च, व्याज आणि शुल्क इ. सह प्रत्यक्ष प्राप्ती पर्यंत भविष्यातील व्याज. **7. ताबा दिनांक : 03.09.2026.**

1. सदर अनामत मत्ता सोडवून घेण्यासाठी उपलब्ध असणाऱ्या वेळेच्या संदर्भात कर्जदाराचे लक्ष सदर अधिनियमातील अनुच्छेद 13 मधील उप-विभाग (8) कडे वेधण्यात येत आहे. **2. कोणत्याही आक्षेपासाठी आणि निराकरणासाठी कृपया : श्री. केदार पाटील, मोबाईल क्र. 9860118039 (प्राधिकृत अधिकारी) / चेतन धनगर, (संकलन व्यवस्थापक) मोबाईल क्र. 9657387750, एचडीबी फायनान्शियल सर्व्हिसेस, 4था मजला, गीताई संकुल, आयडियल कॉलनी, पौड रोड कोथरूड, पुणे-411038 यांच्याशी संपर्क साधा.**

ठिकाण : पुणे — स्वा./- एचडीबी फायनान्शियल सर्व्हिसेस लिमिटेड करिता
दिनांक : 06.09.2026 — प्राधिकृत स्वाक्षरीकर्ता

SBI

भारतीय स्टेट बँक केंद्रीकृत खुदरा आस्ति प्रबंधन केंद्र, तारा चेंबर्स, मराईआई गेट जवळ, वाकडेवाडी, मुंबई–पुणे रोड, पुणे - ४११००३. फोन नं. (०२०) २९९१२११५, Email Id : sbi.65162@sbi.co.in

मागणी नोटीस

Ref No. SBI/CRAMC/2026-27/28 — दिनांक: २१.०८.२०२६

श्रीमती प्रिती श्रीकांत झोपे, (कर्जदार) (पत्नी आणि कर्जदार- (मयत) श्रीकांत शंकर झोपे यांचे कायदेशीर वारसदार.
दोघे राहणार पत्ता:- विष्णुवाडी, भारत कला रोड, शिव मंदिर शेजारी, मलकापूर, बुलढाणा - ४४३१०१

श्रीमती निर्मला शंकर झोपे (आई आणि कर्जदार- (मयत) श्रीकांत शंकर झोपे यांचे कायदेशीर वारसदार.)
दोघे राहणार पत्ता:- निर्मल किराणा, शर्मला साफल्य, सिरसोडी, तालुका- नांदुरा, बुलढाणा - ४४३४०१

कर्जदाराच्या कायदेशीर वारसदार यांना नोटीस

विषय :- सिक्युरिटायझेशन ॲंड रिकंस्ट्रक्शन ऑफ फायनान्शीयल ॲसेटस ॲंड एनफोर्समेंट ऑफ सिक्युरिटी इंटरेस्ट ॲक्ट २००२ (यापुढे 'अधिनियम' असे संबोधिले जाईल) च्या कलम १३ (२) अंतर्गत मागणी सूचना (डिमांड नोटीस)

महोदय,

आम्ही आपल्या निदर्शनास आणू इच्छितो की बँकेने **श्री. श्रिकांत शंकर झोपे** (यानंतर यांचा उल्लेख कर्जदार म्हणून केला जाईल) यांना अर्थसहाय्य केले असून **दिनांक ११.०८.२०२६ रोजी सदर कर्जदार हे बँकेस रु. २८,२७,३०१.०० (रुपये अठावीस लाख सत्तावीस हजार तीनशे एक फक्त)** अधिक कर्ज करारातील व वेळोवेळी केलेल्या दस्तावेजातील दराने या तारखेपुढील, संपूर्ण कर्ज फेड होईपर्यंतच्या तारखेपर्यंतचे व्याज व अन्य खर्च इत्यादी देणे लागत आहेत.

२. **श्री. श्रीकांत शंकर झोपे यांचे ०६.१०.२०२४ रोजी निधन झाले** (यानंतर यांचा उल्लेख मयत असा केला जाईल). मयत कर्जदाराने येथे दिलेल्या परिशिष्ट ए मध्ये अधिक तपशील असलेली मिळकत तारण म्हणून **दिनांक ३०.०३.२०२२** रोजी रीतसर गहाणखत करून गहाण दिलेली आहे. सदर गहाणखत आणि अन्य दस्तावेजांचा तपशील खाली दिलेल्या परिशिष्ट बी मध्ये नोंदविलेला आहे.

३. वर नमूद केलेले आपण सदर मयत कर्जदाराचे वारस असून आपण सदर तारण मिळकतीचे वारस म्हणून हक्कदार आहात आणि त्यामुळे वरील परिच्छेद १ मध्ये नमूद केलेल्या कर्ज रकमेच्या परतफेडीसाठी आपण जबाबदार आहात.

४. सिक्युरिटी ॲरेंजमेंट/दस्तावेज/कन्फर्मेशन (मान्यता) किंवा गहाण खत, सदर तारणाने सुरक्षित केलेली रक्कम की ज्या रकमेच्या परतफेडीसाठी सदर तारण मिळकतीवर बँकेच्या नावे बोजा निर्माण केला आहे, या सगळ्याचा तपशील खाली दिलेल्या परिशिष्ट बी मध्ये नमूद केला आहे.

५. सदर कर्ज / क्रण सुविधा खात्याचा वापर अनियमित झालेला आहे आणि म्हणून सिक्युरिटायझेशन ॲंड रिकन्स्ट्रक्शन ऑफ फायनान्शीयल ॲसेट्स ॲंड एन्फोर्समेंट ऑफ सिक्युरिटी इंटरेस्ट कायदा २००२ च्या कलम २(१)(०) अन्वये, तारणावरील क्रणराशिच्या परतफेडीच्या कुचराई (डिफॉल्ट) या कारणासाठी सदर खाते **दिनांक ०८.०८.२०२६ रोजी अनुत्पादक (एनपीए)** म्हणून वर्गीकृत केले आहे.

६. त्यामुळे, सदर कायद्याच्या कलम १३(२) अन्वये, तुम्हाला याद्वारे सूचित केले जाते की, या नोटीसच्या तारखेपासून ६० दिवसांच्या आत बँकेकडे वरील परिच्छेद १ मध्ये नमूद केलेली देय रक्कम पूर्णपणे अदा करावी; अन्यथा, बँक कलम १३ च्या पोट–कलम ४ आणि सदर कायद्यातील इतर लागू तरतुदींनुसार त्यांना उपलब्ध असलेल्या सर्व किंवा कोणत्याही अधिकारांचा वापर करेल.

७. आपणास आणखी सूचित करण्यात येते की सदर कायद्याच्या कलम १३, उपकलम १३ अन्वये आपणास सदर मिळकतीबाबत विक्री/लीज किंवा अन्य मार्गाने तारण मिळकतीची, बँकेच्या संमतीविना विल्हेवाट लावण्यास प्रतिबंध करण्यात येत आहे.

८. ही नोटीस बँकेला उपलब्ध असलेल्या अन्य कोणत्याही अधिकारास, बँकेला कायद्यातील तरतुदीनुसार कायदेशीर कारवाई करण्याच्या हक्कास बाधा न येता दिलेली आहे.

९. **ही नोटीस सर्व ज्ञात- अज्ञात कायदेशीर वारसदारांसाठी आहे.**

परिशिष्ट 'अ'
स्थावर मालमत्तेचे वर्णन

पुणे म्युनिसिपल कॉर्पोरेशन यांच्या हद्दीतील गाव येरवडा तालुका –पुणे सिटी, जिल्हा – पुणे येथील सीटीएस नं २६६१/२ (जुना एस. नं २४२/१बी) मधील **"वृंदावन" या नावाच्या प्रकल्पामधील 'ए' बिल्डिंगमधील पाचव्या मजल्यावरील श्रीमती प्रिती श्रीकांत झोपे, आणि श्रीकांत श्री. श्रीकांत शंकर झोपे (मयत) यांचे नावे असलेला फ्लॅट नं. ५०३,** कार्पेट क्षेत्र ४४.५७ चौ. मी. अधिक लगतची बाल्कनी क्षेत्र ५.८६ चौ. मी. अधिक ड्राय बाल्कनी क्षेत्र २.०४ चौ. मी. आणि ओपन टेरेस क्षेत्र ३.४४ चौ. मी.

परिशिष्ट 'ब'

कागदपत्रांची यादी (तारणासंबंधी कागदपत्रांचा तपशील, उपकागदपत्रे व अन्य पुरावा ज्याद्वारे मिळकतीचे गहाणखत केले आहे ते दिसेल)

अ.क्र	कागदपत्राचे नाव	सुविधेचा प्रकार	अंमलबजावणी तारीख	रक्कम रु.
१	अरेंजमेंट लेटर (व्यवस्था पत्र)	लोन डॉक्युमेंट	३०.०३.२०२२	३६,२७,०००/-
२	जनतेला मंजूर केलेल्या गृह कर्ज कराराचे मेमोरेंडम	लोन डॉक्युमेंट	३०.०३.२०२२	३६,२७,०००/-
३	डीड ऑफ अंडरटेकिंग	लोन डॉक्युमेंट	३०.०३.२०२२	३६,२७,०००/-
४	ॲफिडेव्हिट	लोन डॉक्युमेंट	३०.०३.२०२२	३६,२७,०००/-
५	मेमोरेंडम ऑफ डिपॉझिट	मॉर्गेज डॉक्युमेंट	३०.०३.२०२२	३६,२७,०००/-
६	रिसीट नं. ८६९० द्वारा मिळकतीवर गहाणखताचा बोजा निर्माण करण्यासाठी मिळकतीचे मूळ दस्तावेज सादर करण्याची सूचना देणारी नोटीस	मॉर्गेज डॉक्युमेंट	१८.०४.२०२२	३६,२७,०००/-

सहि/-
(श्री. अजय कुमार)
(अधिकृत अधिकारी)
भारतीय स्टेट बँक,
केंद्रीकृत खुदरा आस्ति प्रबंधन केंद्र, पुणे

दि. २१.०८.२०२६
ठिकाण : पुणे
(मजकूरात संदिग्धता असल्यास इंग्रजी मजकूर ग्राह्य मानावा)

दि पुसद अर्बन को–ऑप बँक लि.पुसद

मुख्य कार्यालय तलाव ले-आउट पुसद - 445204

परिशिष्ट - IV (नियम 8(1) पहा)

स्थावर मालमत्तेचा सांकेतिक ताबा घेतलेली नोटीस

खालील स्वाक्षरी करणार हे दि.पुसद अर्बन को-ऑप बँक लि.पुसद मुख्य कार्यालय तलाव ले-आउट पुसद जिल्हा यवतमाळ सेक्युरीटायझेशन अॅन्ड रिकन्स्ट्रक्शन ऑफ फायनांन्शियल अॅसेटस् अॅन्ड इन्फोर्समेन्ट ऑफ सेक्युरिटी इंन्ट्रेस्ट अॅक्ट 2002 केंद्रीय कायदा 2002 नं.54 चे अंतर्गत प्राधिकृत अधिकारी आहेत व त्यांनी सदर कायद्याचे कलम 13(2) व नियम 9 सेक्युरिटी इंन्ट्रेस्ट इन्फोर्समेन्ट 2002 नुसार नोटीस मध्ये नमुद केलेली रक्कम 60 दिवसांचे आत भरणा करण्यासाठी **दि.20/05/2026 रोजी डिमांड नोटीस** दिली होती. परंतु सदर कर्जदारांनी नोटीसमध्ये नमुद केलेल्या रकमेचा भरणा न केल्यामुळे या नोटीसव्दारे संबंधित कर्जदार व सर्व जनतेस या व्दारे सूचित करण्यात येते की त्यांनी सदर स्थावर मालमत्ते संदर्भात कोणतेही खरेदी व्यवहार किंवा करार इत्यादी करु नये.

सदर मालमत्तेवर **दि.पुसद अर्बन को-ऑप बँक लि. पुसद, शाखा कोथरुड-पुणे यांचा बोझा आहे व दि.03/09/2026 रोजी सांकेतिक ताबा** घेतलेला आहे.

अ. क्र	कर्जदाराचे नाव व पत्ता	दि.30/04/2026 कर्ज येणे बाकी	सांकेतिक ताबा दिनांक	मालमत्तेचा तपशिल
1	**फॉलीयेज इन्फ्रास्ट्रक्चर प्रोप्रा.श्री.गिरीश अर्जुन मस्तुद रा.** प्लॉट नं.07, लक्ष्मी को-ऑप हाउसिंग सोसायटी, एस.बी. रोड, पॉलीटेकनिक ग्राउंड जवळ, शिवाजी नगर, पुणे. **जामीनदार :-** 1) श्री. प्रकाश शंकर कोरे 2) सौ. वनिता प्रकाश कोरे 3) श्री. सुयोग रामदास लसनपुरे 4) श्री. महेश भगीरथी शेंडगे	रु. 4,67,99,167/- दि. 01/05/2026 पासुनचे व्याज + वसुली खर्च	03/09/2026	**मालमत्ता धारक :- श्री.प्रकाश शंकर कोरे** तुकडी पुणे,पोट तुकडी ता.मुळशी जि.पुणे व मे.सब.रजिस्ट्रार साहेब मुळशी यांचे हद्दीतील तसेच जिल्हा परिषद पुणे तालुका पंचायत समिती मुळशी यांचे हद्दीतील गाव मौजे मुळशी खुर्द येथील सर्व्हे नं.1/1-अ यांसी क्षेत्रफळ 00 हे 06 आर,सर्व्हे नं.1/1-ब यांसी क्षेत्रफळ 00 हे 06 आर, सर्व्हे नं.1/2 यांसी क्षेत्रफळ 00 हे 08 आर, सर्व्हे नं.1/3 यांसी क्षेत्रफळ 00 हे 07 आर, सर्व्हे नं.10/1-अ यांसी क्षेत्रफळ 00 हे 44 आर, सर्व्हे नं.10/1-क यांसी क्षेत्रफळ 00 हे 43 आर, सर्व्हे नं.10/1-ब यांसी क्षेत्रफळ 00 हे 44 आर, सर्व्हे नं.10/2/अ यांसी क्षेत्रफळ 00 हे 36 आर, सर्व्हे नं.10/2/क यांसी क्षेत्रफळ 00 हे 25 आर, सर्व्हे नं.10/2-ब यांसी क्षेत्रफळ 00 हे 20 आर, व सर्व्हे नं.11 यांसी क्षेत्रफळ 00 हे 23.80 आर,सर्व्हे नं.10/2/ड मधील श्री.प्रकाश शंकर कोरे यांचे क्षेत्रफळ 10 आर.आणि सौ.वनिता प्रकाश कोरे यांचे क्षेत्रफळ 10 आर एकुण क्षेत्रफळ 00 हे 20 आर, असे एकुण क्षेत्रफळ 02 हे 82.80 आर पैकी 02 हे 50.23 आर इतक्या क्षेत्राची जमीन मिळकत.

स्थळ :- पुणे
दिनांक :- 06/09/2026

प्राधिकृत अधिकारी
दि.पुसद अर्बन को-ऑप बँक लि.पुसद
शाखा कोथरुड-पुणे

क्रस्ना डायग्नोस्टीक्स लिमिटेड

krsnaa DIAGNOSTICS LET'S DO GOOD...

सीआयएन: एल७४९००पीएन२०१०पीएलसी१३८०६८
नोंदणीकृत कार्यालय: स. नं. २४३/अ, हिस्सा नं. ६, सीटीएस नं.: ४५१९, ४५१९/१, चिंचवड स्टेशनजवळ, चिंचवड, पुणे ४११०१९
फोन (बोर्ड) : +९१ २० २७४० २४००
ई – मेल: investors@krsnaa.in **संकेतस्थळ:** https://krsnaadiagnostics.com

१६ व्या वार्षिक सर्वसाधारण सभेची सूचना, दूरस्थ ई–मतदानाची माहिती, सभासद नोंदवही बंद ठेवणे आणि लाभांश पात्रता

याद्वारे सूचना देण्यात येते की, क्रस्ना डायग्नोस्टिक्स लिमिटेड (**''कंपनी''**) च्या सभासदांची १६ वी वार्षिक सर्वसाधारण सभा (**''सभा''**) **सोमवार, दिनांक २८ सप्टेंबर, २०२६ रोजी सकाळी ११:०० वाजता (भा.प्र.वे.) कंपनीच्या नोंदणीकृत कार्यालयात, स. नं. २४३/अ, हिस्सा नं. ६, सी.टी.एस. नं. ४५१९, ४५१९/१, चिंचवड स्टेशनजवळ, चिंचवड, पुणे – ४११ ०१९, महाराष्ट्र (''सभास्थळ'')** येथे प्रत्यक्ष स्वरुपात, कंपनी कायदा, २०१३ (**''कायदा''**) व त्याखालील नियम, सर्वसाधारण सभांबाबतचे सचिवीय मानक (एसएस–२) आणि सेबी (सूचीबद्धता जबाबदाऱ्या व प्रकटीकरण आवश्यकता) विनियम, २०१५ (**''सेबी सूचीबद्धता विनियम''**) यांतील लागू तरतुदींचे पालन करून, सभा बोलावणाऱ्या सूचनेत (**''सूचना''**) नमूद केलेले सर्वसाधारण व विशेष कामकाज पार पाडण्यासाठी घेण्यात येईल. सदर सभा केवळ प्रत्यक्ष स्वरूपातच घेण्यात येणार असून व्हिडिओ कॉन्फरन्सिंग अथवा अन्य दृक–श्राव्य माध्यमांद्वारे सहभागाची कोणतीही सुविधा उपलब्ध करून दिली जाणार नाही.

कंपनीची सूचना व **३१ मार्च, २०२६** रोजी संपलेल्या आर्थिक वर्षाचा वार्षिक अहवाल **शनिवार, दिनांक ५ सप्टेंबर, २०२६** रोजी (i) ज्या सभासदांनी कंपनी, रजिस्ट्रार व ट्रान्सफर एजंट अथवा त्यांच्या डिपॉझिटरी सहभागींकडे आपले ई–मेल पत्ते नोंदविले आहेत त्यांना इलेक्ट्रॉनिक माध्यमाद्वारे; आणि (ii) ज्या सभासदांनी आपले ई–मेल पत्ते नोंदविलेले नाहीत त्यांना प्रत्यक्ष स्वरूपात, सेबी सूचीबद्धता विनियमांच्या विनियम ३६(१)(ब) अनुसार संपूर्ण वार्षिक अहवाल उपलब्ध असलेल्या वेब–लिंकसह (नेमक्या मार्गासह) पत्रासोबत, पाठविण्यात आले आहेत. कोणताही सभासद investors@krsnaa.in येथे अथवा रजिस्ट्रार व ट्रान्सफर एजंट, केफिन टेक्नॉलॉजिज लिमिटेड यांच्याकडे विनंती करून संपूर्ण वार्षिक अहवालाची छापील प्रत विनामूल्य मिळवू शकतो. सूचना व वार्षिक अहवाल कंपनीच्या संकेतस्थळावर www.krsnaadiagnostics.com येथे, नॅशनल सिक्युरिटीज डिपॉझिटरी लिमिटेड (**"NSDL"**) च्या ई–मतदान संकेतस्थळावर https://www.evoting.nsdl.com येथे, तसेच BSE Limited च्या www.bseindia.com व National Stock Exchange of India Limited च्या www.nseindia.com या संकेतस्थळांवरही उपलब्ध आहेत.

उपस्थिती व प्रतिनिधी (प्रॉक्सी)

सभेस उपस्थित राहून मतदान करण्यास पात्र असलेला सभासद, आपल्या वतीने उपस्थित राहून मतमोजणीच्या (poll) वेळी मतदान करण्यासाठी प्रतिनिधी (प्रॉक्सी) नेमू शकतो आणि असा प्रतिनिधी कंपनीचा सभासद असणे आवश्यक नाही. प्रतिनिधी नेमणुकीचा दस्तऐवज रीतसर भरून, मुद्रांकित व स्वाक्षरित करून, सभेच्या प्रारंभापूर्वी किमान अठ्ठेचाळीस तास आधी, म्हणजेच **शनिवार, दिनांक २६ सप्टेंबर, २०२६ रोजी सकाळी ११:०० वाजेपर्यंत (भा.प्र.वे.)**, कंपनीच्या नोंदणीकृत कार्यालयात जमा करणे आवश्यक आहे. प्रतिनिधीस सभेत बोलण्याचा अधिकार असणार नाही व मतमोजणी वगळता अन्यथा मतदानाचा अधिकार असणार नाही. एक व्यक्ती जास्तीत जास्त पन्नास सभासदांच्या वतीने आणि मतदानाचा अधिकार असलेल्या कंपनीच्या एकूण भागभांडवलाच्या दहा टक्क्यांपेक्षा अधिक नसलेल्या भागधारणेच्या मर्यादेत प्रतिनिधी म्हणून काम करू शकते. नमुना MGT-11 मधील प्रतिनिधी नमुना, उपस्थिती पत्रक तसेच ठळक खुणेसह सभास्थळाचा मार्गनकाशा सूचनेसोबत जोडण्यात आले आहेत. सभासद, प्रतिनिधी व अधिकृत प्रतिनिधींनी सभास्थळी प्रवेशासाठी रीतसर भरलेले व स्वाक्षरित उपस्थिती पत्रक आणि वैध छायाचित्र ओळखपत्र सोबत आणावे. कॉर्पोरेट सभासदांनी आपल्या प्रतिनिधीस सभेस उपस्थित राहून मतदान करण्यास प्राधिकृत करणाऱ्या संचालक मंडळाच्या ठरावाची अथवा कायद्याच्या कलम ११३ अन्वये कुलमुखत्यारपत्राची प्रमाणित प्रत आगाऊ पाठवावी.

दूरस्थ ई–मतदान व सभेतील मतदान

कायद्याच्या कलम १०८ सहवाचता कंपनी (व्यवस्थापन व प्रशासन) नियम, २०१४ (सुधारित) मधील नियम २० आणि सेबी सूचीबद्धता विनियमांच्या विनियम ४४ अन्वये, सूचनेत नमूद केलेले कामकाज इलेक्ट्रॉनिक माध्यमाद्वारे मतदानाने पार पाडता येईल आणि सभासदांना सूचनेत नमूद केलेल्या ठरावांवर मतदानाचा हक्क बजावण्यासाठी NSDL यांनी उपलब्ध करून दिलेल्या इलेक्ट्रॉनिक मतदान प्रणालीद्वारे (**''दूरस्थ ई–मतदान''**) सुविधा उपलब्ध करून देण्यात आली आहे.

याशिवाय, ज्या सभासदांनी दूरस्थ ई–मतदानाद्वारे आपले मत नोंदविलेले नाही आणि जे अन्यथा प्रतिबंधित नाहीत, असे सभेस प्रत्यक्ष उपस्थित असलेले सभासद सभास्थळी मतपत्रिकेद्वारे मतदानाचा हक्क बजावण्यास पात्र असतील. दूरस्थ ई–मतदानाद्वारे मतदानाचा हक्क बजावल्यानंतरही सभासद सभेत सहभागी होऊ शकतो; परंतु त्यास सभेत पुन्हा मतदान करण्याची मुभा असणार नाही.

डिमॅट स्वरूपात भाग धारण करणारे सभासद, प्रत्यक्ष (भौतिक) स्वरूपात भाग धारण करणारे सभासद आणि ज्यांनी आपले ई–मेल पत्ते नोंदविलेले नाहीत असे सभासद यांच्यासाठीची दूरस्थ ई–मतदानाची कार्यपद्धती सूचनेत सविस्तर नमूद केली असून ती कंपनीच्या संकेतस्थळावर www.krsnaadiagnostics.com येथे, NSDL च्या ई–मतदान संकेतस्थळावर https://www.evoting.nsdl.com येथे, तसेच BSE Limited च्या www.bseindia.com व National Stock Exchange of India Limited च्या www.nseindia.com या संकेतस्थळांवर उपलब्ध आहे.

कट–ऑफ दिनांक, म्हणजेच **सोमवार, दिनांक २१ सप्टेंबर, २०२६** रोजी सभासद नोंदवहीत अथवा डिपॉझिटरीजकडील लाभार्थी मालक नोंदवहीत ज्या व्यक्तीचे नाव नोंदविलेले असेल, तीच व्यक्ती दूरस्थ ई–मतदान तसेच सभेतील मतदानाची सुविधा घेण्यास पात्र असेल. कट–ऑफ दिनांकास जी व्यक्ती सभासद नाही, तिने ही जाहिरात व सभेची सूचना केवळ माहितीसाठी समजावी. सभासदांचे मतदानाचे अधिकार कट–ऑफ दिनांकास कंपनीच्या भरणा झालेल्या समभाग भांडवलातील त्यांच्या भागधारणेच्या प्रमाणात असतील.

दूरस्थ ई–मतदानाचा कालावधी **शुक्रवार, दिनांक २५ सप्टेंबर, २०२६ रोजी सकाळी ०९:०० वाजता (भा.प्र.वे.)** सुरू होईल व **रविवार, दिनांक २७ सप्टेंबर, २०२६ रोजी सायंकाळी १७:०० वाजता (भा.प्र.वे.)** संपेल. सदर दिनांक व वेळेनंतर दूरस्थ ई–मतदानास परवानगी दिली जाणार नाही आणि त्यानंतर NSDL कडून दूरस्थ ई–मतदान प्रणाली बंद करण्यात येईल. सूचना पाठविल्यानंतर कंपनीचा सभासद झालेली आणि कट–ऑफ दिनांक म्हणजेच सोमवार, दिनांक २१ सप्टेंबर, २०२६ रोजी भाग धारण करणारी कोणतीही व्यक्ती evoting@nsdl.co.in, einward.ris@kfintech.com व investors@krsnaa.in येथे विनंती पाठवून लॉगिन आयडी व पासवर्ड प्राप्त करू शकते. ज्या सभासदाची दूरस्थ ई–मतदानासाठी NSDL कडे यापूर्वीच नोंदणी झाली आहे, तो आपला विद्यमान यूजर आयडी व पासवर्ड वापरू शकतो.

श्री. दिनेश बिर्ला (FCS क्र. ७६५८, CP क्र. १३०२९), प्रॅक्टिसिंग कंपनी सेक्रेटरी, यांची दूरस्थ ई–मतदान व सभेतील मतदानाची निष्पक्ष व पारदर्शक पद्धतीने छाननी करण्यासाठी छाननीकार (Scrutinizer) म्हणून नियुक्ती करण्यात आली आहे. छाननीकार सभेच्या समाप्तीपासून तीन दिवसांच्या आत आपला एकत्रित अहवाल अध्यक्षांना सादर करतील. छाननीकारांच्या अहवालासह घोषित निकाल सभेच्या समाप्तीपासून दोन कामकाजाच्या दिवसांच्या आत शेअर बाजारांना (BSE व NSE) तसेच NSDL यांना कळविण्यात येतील व कंपनीच्या www.krsnaadiagnostics.com या संकेतस्थळावर प्रसिद्ध करण्यात येतील. ठराव आवश्यक बहुमताने मंजूर झाल्यास, ते सभेच्या दिनांकास मंजूर झाल्याचे मानण्यात येईल.

कायद्याच्या कलम ९१ सहवाचता त्याखालील नियम आणि सेबी सूचीबद्धता विनियमांच्या विनियम ४२ अन्वये याद्वारे सूचना देण्यात येते की, कंपनीची सभासद नोंदवही व भाग हस्तांतरण नोंदवह्या **मंगळवार, दिनांक २२ सप्टेंबर, २०२६ ते सोमवार, दिनांक २८ सप्टेंबर, २०२६ (दोन्ही दिवस धरून)** या कालावधीत, सभेच्या प्रयोजनार्थ तसेच सभेत लाभांश घोषित झाल्यास त्यासाठीची सभासदांची पात्रता निश्चित करण्यासाठी, बंद ठेवण्यात येतील.

सभेत लाभांश घोषित झाल्यास, तो घोषणेच्या दिनांकापासून तीस दिवसांच्या आत, **शुक्रवार, दिनांक १८ सप्टेंबर, २०२६** रोजी कामकाजाच्या वेळेच्या समाप्तीस सभासद नोंदवहीत अथवा डिपॉझिटरीजनी पुरविलेल्या लाभार्थी मालकांच्या यादीत ज्यांची नावे नोंदविलेली असतील अशा सभासदांना अदा करण्यात येईल. लाभांशावर प्राप्तिकर कायदा, १९६१ अन्वये लागू दराने उद्गम कर कपात (TDS) करण्यात येईल. सभासदांनी आपला कायम खाते क्रमांक (PAN), निवासी दर्जा, बँक खाते तपशील आणि लागू असल्यास नमुना 15G / नमुना 15H अथवा अन्य सवलत घोषणापत्रे, **शुक्रवार, दिनांक १८ सप्टेंबर, २०२६** रोजी अथवा त्यापूर्वी, डिमॅट स्वरूपातील भागांसाठी आपल्या डिपॉझिटरी सहभागीकडे व प्रत्यक्ष स्वरूपातील भागांसाठी रजिस्ट्रार व ट्रान्सफर एजंटकडे अद्ययावत करून घ्यावीत.

प्रत्यक्ष (भौतिक) स्वरूपात भाग धारण करणाऱ्या सभासदांनी आपला कायम खाते क्रमांक (PAN), पिन कोडसह टपाल पत्ता, ई–मेल पत्ता, भ्रमणध्वनी क्रमांक, बँक खाते तपशील, नमुना स्वाक्षरी व नामनिर्देशन, लागू असल्यानुसार नमुना ISR-1 ते ISR-4, SH-13 व SH-14 मध्ये, इश्यू व शेअर ट्रान्सफर एजंटसाठीच्या सेबीच्या मास्टर परिपत्रकानुसार रजिस्ट्रार व ट्रान्सफर एजंटकडे सादर करावेत. डिमॅट स्वरूपात भाग धारण करणाऱ्या सभासदांनी हे तपशील आपल्या डिपॉझिटरी सहभागीकडे अद्ययावत करावेत.

कायद्याच्या कलम १७० अन्वये ठेवण्यात येणारी संचालक व प्रमुख व्यवस्थापकीय कर्मचारी आणि त्यांच्या भागधारणेची नोंदवही, कलम १८९ अन्वये ठेवण्यात येणारी ज्या करारांमध्ये अथवा व्यवस्थांमध्ये संचालकांचे हितसंबंध आहेत अशा करारांची नोंदवही, तसेच सूचनेत व स्पष्टीकरणात्मक विवरणपत्रात संदर्भित इतर सर्व दस्तऐवज सभेच्या कालावधीत सभास्थळी सभासदांच्या पाहणीसाठी उपलब्ध असतील.

दूरस्थ ई–मतदान अथवा सभेतील मतदानासंबंधी कोणतीही शंका अथवा तक्रार असल्यास, सभासद https://www.evoting.nsdl.com च्या डाउनलोड विभागात उपलब्ध असलेल्या वारंवार विचारल्या जाणाऱ्या प्रश्नांचा (FAQs) व ई–मतदान वापरकर्ता पुस्तिकेचा संदर्भ घेऊ शकतात, अथवा पुढील व्यक्तींशी संपर्क साधू शकतात: (i) श्री. सुजॉय सुदिप्ता बोस, कंपनी सचिव व अनुपालन अधिकारी, क्रस्ना डायग्नोस्टिक्स लिमिटेड, स. नं. २४३/अ, हिस्सा नं. ६, सी.टी.एस. नं. ४५१९, ४५१९/१, चिंचवड स्टेशनजवळ, चिंचवड, पुणे – ४११ ०१९, महाराष्ट्र, दूरध्वनी: +९१ २० २७४० २४००, ई–मेल: investors@krsnaa.in; (ii) KFin Technologies Limited, रजिस्ट्रार व ट्रान्सफर एजंट, Selenium, Tower-B, Plot No. 31 & 32, Financial District, Nanakramguda, Serilingampally Mandal, Hyderabad – 500 032, India ई–मेल: einward.ris@kfintech.com; अथवा (iii) NSDL ई–मतदान हेल्पडेस्क, श्री. अभिजीत गुंजाळ, ई–मेल: evoting@nsdl.co.in, टोल फ्री क्र.: ०२२–४८८६ ७०००.

कंपनीच्या संचालक मंडळाच्या आदेशावरून
क्रस्ना डायग्नोस्टीक्स लिमिटेड करिता

नोंदणीकृत कार्यालय :
स. नं. २४३/अ, हिस्सा नं. ६, सीटीएस नं. ४५१९, ४५१९/१,
चिंचवड स्टेशन जवळ, चिंचवड, पुणे – ४११०१९, महाराष्ट्र, इंडिया

सही/–
सुजोय सुदिप्ता बोस
कंपनी सचिव व अनुपालन अधिकारी
सभासदत्व क्र.: F-13902

स्थळ: पुणे
दिनांक: सप्टेंबर ०५, २०२६

केनरा बँक Canara Bank
सिंडिकेट Syndicate

वसुली विभाग, क्षेत्रीय कार्यालय पुणे ।
३रा मजला, फोर्थ डायमेंशन बिल्डींग, सीटीएस नं. १३६,
गुळवणी महाराज रोड, पांडुरंग कॉलनी, एरंडवणे, पुणे–४११००४
ईमेल : recropune@canarabank.com, फोन : ०२०–२५५१२११८

तारण अंतर्गत जंगम मालमत्तेसाठी ई–लिलाव विक्री सूचना

या ठिकाणी सर्वसाधारण जनतेस आणि कर्जदार व जामीनदार यांना विशेषकरुन सूचना देण्यात येते की पुढे नमूद केलेल्या स्थावर/जंगम मालमत्ता ज्या सुरक्षित धनको यांच्याकडे गहाण/बोज्याअंतर्गत असून कॅनरा बँक संबंधित शाखेचे अधिकृत अधिकारी यांनी या मालमत्तेचा **ताबा** घेतला आहे, या संदर्भात **कर्जदार** यांच्याकडून संबंधित शाखांना येणे असलेली रक्कम अधिक त्यावरील व्याज आणि आकार वसुल करण्याकरिता सदर मालमत्तांची विक्री **"जसे आहे, जेथे आहे"** आणि **"जसे आहे, जे आहे"** आणि **"तेथे जे आहे"** या तत्त्वावर खाली नमूद तारखांना करण्यात येणार आहे. **स्थावर मालमत्ता, राखीव किंमत, बयाणा आणि बयाणा भरण्याची अंतिम तारीख यांचे पूर्ण तपशील खालीलप्रमाणे**

संपूर्ण रक्कम रुपयांत

अ. क्र.	संपर्क क्र. व शाखेचे आणि कर्जदाराचे नाव	येणे रक्कम व ताब्याचा प्रकार	मालमत्तेचा तपशील आणि माहित असलेला बोजा	ई ऑक्शनची तारीख	राखीव किंमत	बयाणा रक्कम आणि बयाणा भरण्याची अंतिम तारीख
१	शाखा : पुणे डेक्कन जिमखाना (००३८२) संपर्क : ९४८०९३६७६७ **एआर इंजिनिअरींग**, दुकान नं. बी २०, प्लॉट नं. टी–२०४, पवन इंडस्ट्रीयल को–ऑप सोसा. लि., डी. वाय. पाटील कॉलेज रोड, एमआयडीसी भोसरी, पुणे महाराष्ट्र–४११०२६, **रौफ वजीर शेख**, कुलदीप आंगन, सी विंग, फ्लॅट नं. १४ए, श्रीजी कॉम्प्लेक्स, नेहरु नगर, पिंपरी, पुणे महाराष्ट्र–४११०१८	रु. ५४,९४,८६९.१८ अधिक त्यावरील दि. ०२/०९/२०२६ रोजी, व्याज व किंमत यांसहीत **ताब्याचा प्रकार :** प्रत्यक्ष ताबा	सीएनसी लेथ मशीन मॅन्युफॅक्चर एमएसीपॉवर सीएनसी मशिन्स् लि. मॉडेल : व्हीएक्स–२००, कंट्रोलर : फॅनुक ०१ टीपी प्लस **(बँकेला माहित असलेला बोजा – नाही)**	२१/०९/२०२६	रु. ११,००,०००/–	रु. १,१०,०००/– दि. १९/०९/२०२६ रोजी दु. ०४.०० पर्यंत

विक्रीच्या सविस्तर अटी आणि शर्तीकरिता कृपया कॅनरा बँकची वेबसाईट म्हणजे **(www.canarabank.com)** यावर उपलब्ध करुन देण्यात आलेली ई–ऑक्शन लिंक पहावी. किंवा लिलाव सेवा पुरवठादार यांची वेबसाईट **https://BAANKNET.com/** पहावी किंवा कॅनरा बँकेच्या संबंधित शाखांचे शाखा व्यवस्थापक यांच्याशी कोणत्याही कामाच्या दिवशी कार्यालयीन कामकाजाच्या वेळेत संपर्क साधावा.

दिनांक : ०३/०९/२०२६,
स्थळ : पुणे

अधिकृत अधिकारी,
कॅनरा बँक

एचडीबी फायनान्शियल सर्व्हिसेस लिमिटेड

HDB FINANCIAL SERVICES

नोंदणीकृत कार्यालय : राधिका, दुसरा मजला, लॉ गार्डन रोड, नवरंगपुरा, अहमदाबाद-380009.
प्रादेशिक / शाखा कार्यालय : पहिला मजला, विल्सन हाऊस, जुना नगरदास मार्ग, अंधेरी (पूर्व), मुंबई-400069.
शाखा कार्यालय : एचडीबी फायनान्शियल सर्व्हिसेस लिमिटेड, चौथा मजला, गीताई संकुल, रिलायन्स डिजिटलच्या वर, आयडियल कॉलनी, पौड रोड, कोथरूड, पुणे, महाराष्ट्र 411038.

अचल मालमत्तांच्या विक्रीसाठी ई-लिलावासाठी जाहीर सूचना

बयाणा रक्कम आणि दस्तावेज सादर करण्याचा शेवटचा दिनांक 08/10/2026 रोजी सायं. 05.00 वाजेपर्यंत

सिक्युरिटायझेशन ॲंड रिकन्स्ट्रक्शन ऑफ फायनान्शियल ॲसेट्स ॲंड एनफोर्समेंट ऑफ सिक्युरिटी इंटरेस्ट ॲक्ट (सरफेसी), 2002 (2002 चा क्र. 54) अंतर्गत **एचडीबी फायनान्शियल सर्व्हिसेस लिमिटेड** कडे तारण असलेल्या अचल मालमत्तेची विक्री. ज्याअर्थी, एचडीबी फायनान्शियल सर्व्हिसेस लिमिटेड च्या प्राधिकृत अधिकाऱ्यांनी सरफेसी कायद्यांतर्गत खालील मालमत्तेचा ताबा घेतला असून **"जसे आहे जेथे आहे" आणि "जसे आहे जे काही आहे" आणि "तेथे जे काही आहे"** तत्त्वावर विक्री करण्याचा अधिकार आहे. **देय हे डीआरटी पुणे यांच्यासमोर प्रलंबित असलेल्या एस.ए. क्र. 717/2026 च्या निकालाच्या अधीन राहून आहे.** सदर विक्री निम्नस्वाक्षरीकाराद्वारे https://bankeauctions.com या वेबसाईटवरील ई-लिलाव मंचाद्वारे केली जाईल.

अचल मालमत्तेचे वर्णन

लॉट क्र.	शाखेचे नाव आणि कर्ज खाते तपशील आणि ग्राहकाचे नाव	लिलाव विक्रीसाठी असलेल्या तारण मालमत्तेचे वर्णन आणि ताब्याची स्थिती	मागणी सूचना दिनांक (सुरक्षित कर्ज)	प्राधिकृत अधिकारी तपशील	बयाणा रकमेच्या भरण्यासाठी खात्याचे तपशील	आरक्षित किंमत / बयाणा रक्कम / बोली वृद्धी रक्कम	ई-लिलावाची तारीख / वेळ आणि बयाणा रक्कम सादरीकरणाची शेवटची तारीख
1.	एचडीबी फायनान्शियल सर्व्हिसेस लिमिटेड, 4था मजला, गीताई शॉपिंग मॉल, स. क्र. 17-34, पौड रोड, गुरुप्रसाद स्वामीया, आयडियल कॉलनी, कोथरूड, पुणे महाराष्ट्र 411038. **कर्ज खाते क्र. :- 53082689** **1. राज गोल्ड सिस्टम** 768 बुधवार पेठ पुणे - 411002 महाराष्ट्र, आणि तसेच फ्लॅट क्र. 7 अपार्टमेंट क्र. 7ए स्ट्रीट दुसरा मजला जलदीप अपार्टमेंट सीटीएस क्र. 489, 490, 499, 500 आणि 501 पुणे - 411011. **2. राम प्रशांत खटुआ** 501 कसबा पेठ जलदीप अपार्टमेंट फ्लॅट क्र. ए7 कसबा पेठ सतोटी पोलीस चौकी जवळ पुणे - 411011 महाराष्ट्र. **3. प्रशांत खटुआ** 501 कसबा पेठ जलदीप अपार्टमेंट फ्लॅट क्र. ए7 कसबा पेठ सतोटी पोलीस चौकी जवळ पुणे - 411011 महाराष्ट्र.	**सुरक्षा - I ची अनुसूची :-** पुढील मालमत्तेचे सर्व खंड आणि तुकडे, फ्लॅट क्र. 7 म्हणजे अपार्टमेंट क्र. 7ए, मोजमाप सुमारे 46.45 चौरस मीटर बिल्ट अप क्षेत्रफळ स्टिल्ट दुसऱ्या मजल्यावर स्थित, सोबत इमारतीत सामायिक क्षेत्र आणि सुविधा मध्ये 3.92 % अविभाजित हिस्सा, "जलदीप अपार्टमेंट" म्हणून ओळखल्या जाणाऱ्या इमारतीत, जे मालमत्ता संबंधित सीटीएस क्र. 489, 490, 499, 500 आणि 501 यावर बांधलेले, महसूल गाव कसबा पेठ, तालुका हवेली येथे स्थित, पुणे महानगरपालिका शहराच्या स्थानिक हद्दीत आणि नोंदणी जिल्हा, पुणे, उप जिल्हा तालुका हवेली, पिन 411011 यांच्या अधिकारक्षेत्रात. आणि **चतुःसीमा पुढीलप्रमाणे:-** उत्तर - जिना आणि डक्ट, दक्षिण - युनिट 12 च्या वर ओपन स्पेस, पूर्व - युनिट 7बी चा भाग आणि डक्ट, पश्चिम - सीटीएस क्र. 498 कसबा पेठ आणि डक्ट. **ताबा स्थिती : प्रत्यक्ष ताबा**	16.01.2026 रु. 43,97,759.4/- (रुपये त्रेचाळीस लाख सत्याण्णव हजार सातशे एकोणसाठ आणि चाळीस पैसे फक्त) दि. 12.01.2026 रोजी पर्यंत आणि सोबत आनुषंगिक खर्च, व्याज आणि शुल्क इ. सह प्रत्यक्ष प्राप्ती पर्यंत भविष्यातील करार व्याज.	श्री. केदार पाटील मो. क्र. 9860118039 ईमेल आयडी : lm.kothrud@hdbfs.com	A/c No. 00210310002731 A/c Name - HDBFS GENERAL receipts, IFSC Code- HDFC0000021 Bank - HDFC BANK LTD Branch - HYDER-ABAD- LAKDIKA-PUL MICR CODE - 500240002	रु. 55,40,288/- (रुपये पंचावन्न लाख चाळीस हजार दोनशे अठ्ठ्याऐंशी फक्त) **बयाणा रक्कम** रु. 5,54,029/- (रुपये पाच लाख चौपन्न हजार एकोणतीस रुपये फक्त) **बोली वृद्धी रक्कम** रु. 15000/-	09.10.2026 रोजी स. 11 ते सायं. 5.00 सर्वाधिक बोलीनंतर सहभागींनी दिलेल्या मुदत बोलीनंतर 5 मिनिटांच्या अमर्यादित विस्तारांसह. **बयाणा रक्कम सादरीकरणाची शेवटची तारीख 08.10.2026 रोजी स. 11 ते सायं. 5.**

अटी व शर्ती : सदर ई-लिलाव **"जशी आहे जेथे आहे" आणि "जशी आहे जे काही आहे" आणि "तेथे जे काही आहे"** तत्त्वावर आयोजित करण्यात येईल. 1. प्राधिकृत अधिकाऱ्याच्या माहितीनुसार सदर मालमत्तेवर कोणतीही बोजे नाहीत. परंतु, इच्छुक बोलीदारांनी आपली बोली सादर करण्यापूर्वी लिलावात काढण्यात आलेल्या मालमत्तेचा मालकी हक्क आणि बोजे तसेच मालमत्तेवर परिणाम करू शकणारे दावे / अधिकार / देय यांबाबत स्वतंत्रपणे चौकशी करावी. ई-लिलाव जाहिरात एचडीबी फायनान्शियल सर्व्हिसेस लिमिटेड यांचेकडून कोणतेही वचन नाही किंवा त्याचे प्रतिनिधित्व करीत नाही. सदर मालमत्तेची विक्री एचडीबी फायनान्शियल सर्व्हिसेस लिमिटेड ला ज्ञात किंवा अज्ञात असलेल्या सर्व विद्यमान आणि भावी बोजांसह करण्यात येत आहे. प्राधिकृत अधिकारी / सुरक्षित धनको कोणत्याही तृतीय पक्षाच्या दाव्यांसाठी / अधिकारांसाठी / थकबाकीसाठी कोणत्याही प्रकारे जबाबदार राहणार नाहीत. 2. बोली सादर करण्याआधी मालमत्तेची आणि विनिर्देशांची पाहणी करणे आणि खात्री करून घेणे ही बोलीदारांची जबाबदारी असेल. इच्छुक बोलीदारांना दि. 16.09.2026 पर्यंत (कामकाजाच्या वेळेत) लिलावात काढण्यात आलेल्या मालमत्तेची पाहणी करता येईल. इच्छुक बोलीदार आपली बयाणा रक्कम सदर ई-लिलाव सेवा पुरवठादाराच्या वेबसाईट https://www.bankeauctions.com वर ऑनलाईन सादर करू शकतात. ... (https://www.bankeauctions.com) ... प्राधिकृत अधिकारी श्री. केदार पाटील, मोबाईल क्र. 9860118039, ईमेल आयडी : lm.kothrud@hdbfs.com ... 08/10/2026 रोजी सायं. 5.00 वाजेपर्यंत ... 9. बोलीदारांनी आपली बोली सादर करण्यापूर्वी ई-लिलाव विक्रीच्या सविस्तर अटी व शर्तींसाठी https://www.bankeauctions.com येथे देण्यात आलेल्या लिलाव अटी व शर्तींचा संदर्भ घ्यावा. 10. डीआरटी पुणे यांच्यासमोर प्रलंबित असलेल्या एस.ए. क्र. 717/2026 ... **विशेष सूचना : 11.** बोलीदारांनी स्वतःच्या हित लक्षात घेता शेवटच्या क्षणी बोली देणे टाळावे ... एचडीबी फायनान्शियल सर्व्हिसेस लिमिटेड किंवा सेवा पुरवठादार जबाबदार राहणार नाहीत ...

सरफेसी अधिनियम, 2002 अंतर्गत 30 दिवसांची वैधानिक विक्री सूचना

याद्वारे कर्जदार / जामीनदार यांना सूचित करण्यात येते की त्यांनी वर नमूद रकमेचा आणि आजपर्यंतचे व्याज व आनुषंगिक खर्चाचा ई-लिलावाच्या दिनांकाआधी भरणा करावा, अन्यथा मालमत्तेचा लिलाव / विक्री करण्यात येईल आणि काही थकबाकी शिल्लक राहिल्यास ती व्याज व शुल्कासह वसूल करण्यात येईल.

दिनांक : 06.09.2026 — स्वा./- प्राधिकृत अधिकारी
ठिकाण : पुणे — एचडीबी फायनान्शियल सर्व्हिसेस लिमिटेड